जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - दिनांक- २९/०९/२०२४

**भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर**

# अनैतिक संबंधातुन पत्नीने प्रियकराचे मदतीने केला पतीचा खुन
# पत्नीस व प्रियकारास ४८ तासात अटक, भारती विद्यापीठ तपास पथकाची कामगीरी

दिनांक २३/०९/२०२४ रोजी भारती हॉस्पिटल कात्रज पुणे येथुन भारती विदयापीठ पोलीस ठाणे येथे खबर मिळाली की, इसम गोपीनाथ बाळु इंगुळकर वय ३७ वर्षे रा.दुगडशाळे जवळ सच्चाईमाता मंदिर जवळ कात्रज पुणे यांना बेशुध्द अवस्थेत भारती हॉस्पिटल येथे आणले असता डॉक्टर यांनी उपचारापुर्वी मयत घोषीत केले. आकस्मात मयत रजि.२२९/२०२४ प्रमाणे दाखल करण्यात आले व ससुन हॉस्टिटल येथे मयताचे शव विच्छेदन झाल्यानंतर मयतास मरण हे गळा दाबल्याने आल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन मृत्यु संशयास्पद असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री दशरथ पाटील यांनी तात्काळ सदर मयताबाबत सखोल तपास करणे बाबत भारती विद्यापाठ पोलीस ठाणे तपास पथक यांना आदेश दिले वरुन तपास प्रमुख सपोनि समिर कदम यांनी वपोनि यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकामधील अंमलदार यांच्या चार वेगवेगळ्या टिम तयार करुन रवाना केल्या.

त्यावरुन स.पो.फौ.नामदेव रेणुसे व सतिश मोरे यांनी मयताचे राहते घराचे ठिकाणी तसेच मयत व मयताची पत्नी यांचे मुळ गावी जावून गोपनीय रित्या माहिती घेतली असता मयताची पत्नी नामे राणी गोपीनाथ इंगुळकर वय ३२ वर्षे रा.दुगड शाळेजवळ सच्चाई माता मंदिर कात्रज पुणे हिचे बाहेर अनैतिक संबंध असले बाबत माहिती मिळाल्याने मयताचे पत्नीस चौकशी कामी पोलीस ठाणे येथे बोलावून तिचेकडे सखोल कौशल्यपुर्वक विचारपुस केली असता तिने प्रथम उडवा-उडवीची व असमाधाकारक उत्तरे दिली असता संशय आल्याने आम्ही अधिक सखोल तपास करुन विश्वासात घेवुन विचारता तिने तिचा प्रियकर नामे नितिन शंकर ठाकर रा.कुरण ता.वेल्हा जि.पुणे याने आणि मी संगनमत करुन माझा पती गोपीनाथ बाळु इंगुळकर याचा आम्ही दोघांनी मिळुन हात-पाय धरुन गळा दाबुन खुन केल्याची कबुली दिली.

यावरुन लागलीच नितिन शंकर ठाकर याचा शोध घेत असताना **सपोफौ नामदेव रेणुसे व सतिश मोरे** यांनी गोपनीय माहिती घेतली असता तो त्यांचे गावी पळुन जाणार असल्याची माहिती मिळताच पोउपनिरी निलेश मोकाशी, सपाफौ नामदेव रेणुसे, पोलीस अंमलदार निलेश ढमढेरे व सतिश मोरे यांनी स्वारगेट या ठिकाणी सापळा रचुन शिताफिने आरोपीस ताब्यात घेतले. त्याचेकडेही सखोल कौशल्यर्पुवक तपास करता तो ही प्रथम उडवा-उडवीची व असमाधाकारक उत्तरे देत होता. त्यास विश्वासात घेवुन तपास करता त्याने ही सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाणे गु.र.नं.७८७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०३, ३ (५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल असुन आरोपी **१.राणी गोपीनाथ इंगुळकर वय ३२ वर्षे रा.दुगड शाळेजवळ सच्चाई माता मंदिर कात्रज पुणे. मुळ गांव सुरवड/वांगणी ता.वेल्हे जि.पुणे २. नितिन शंकर ठाकर वय ४५ वर्षे रा.कुरण ता.वेल्हा जि.पुणे** यांना अटक करण्यात आली असुन त्यांची मा.न्यायालयाने दिनांक ३०.०९.२०२४ रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली असुन सदरच्या पोलीस कस्टडीमध्ये आरोपी राणी गोपीनाथ इंगुळकर व तिचा प्रियकर नितिन शंकर ठाकर यांचे प्रेमसंबध गेले १० वर्षापासुन असुन पतीची अडसर येत असल्याने दोघांनी कट रचुन खुन केल्याची कबुली दिली आहे. पुढील तपास सपोनि श्री भोजलिंग दोडमिसे हे करीत आहेत.मयताचे पत्नी व प्रियकराने मयतास अकस्मात मयत दाखवण्याचा बनाव करुन पोलीसांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला होता परंतु पोलीसांनी सखोल तपास व आपले कौशल्य वापरुन सदर खुनाचा गुन्हा उघड केला आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील,मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्रीमती नंदिनी वग्यानी वरीष्ठ पोलीस निरीक्षक,भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे श्री. दशरथ पाटील, पो.नि.गुन्हे श्री. शरद झिने,यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि समीर कदम, पोउनि निलेश मोकाशी, स.पो.फौ.नामेदव रेणुसे, शैलेंद्र साठे पोलीस अंमलदार चेतन गोरे, हनुमंत मासाळ, महेश बारावकर, निलेश ढमढेरे, निलेश जमदाडे, मंगेश पवार, सतीश मोरे, नवथाथ भोसले, आबासाहेब खाडे, अवधतु जमदाडे, सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचीन गाडे, मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे यांच्या पथकाने केली आहे.